# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,

अवसरी (खुर्द), ता.आंबेगाव, जि.पुणे-412405

दूरध्वनी क्र. 02133-225900 फॅक्स क्र. 02133-225901 ई मेंल - gcoeara@gmail.com


जा.क्र.शाअसंमअ/लेखा/मा.वे.चि/2015/3568 दिनांक :- 17 NOV 2015

## परिपत्रक

**विषय :- सेवार्थ प्रणालीमधून अधिकारी व कर्मचा-यांनी मासिक वेतन चिठठी वैयक्तीकरित्या काढणेबाबत.**

या संस्थेतील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, अधिकारी व कर्मचा-यांनी त्यांच्या मासिक वेतन चिठठया सेवार्थ प्रणालीमधून user name- sevarth Id वापरून वैयक्तीकरित्या काढण्यात याव्यात. प्रत्येक अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांचा Sevarth Id जाणून घेण्यासाठी आस्थापना विभागाशी संपर्क साधावा आणि सेवार्थ आयडी कायमस्वरूपी स्वत:कडे लिहून ठेवावा आणि तो वापरावा. प्रत्येकाने Password हा प्रथमत: ifms123 हा वापरावा व प्रथम वापरानंतर तो बदलून घ्यावा व गुप्त ठेवावा.

या कार्यालयाची वेतन देयके प्रत्येक महिन्याला उपकोषागार कार्यालय, आंबेगाव (घोडेगांव) येथून पारित झाल्यानंतर साधारणत: त्यानंतर 10 दिवसांनी पुणे कोषागार कार्यालय, पुणे यांचेकडून वेतन देयकांचे कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांक या कार्यालयास प्राप्त होतात. त्या आधारे वेतन देयके या कार्यालयाकडून सेवार्थ प्रणालीतून लॉक (LOCK) केल्यानंतर वेतन चिठठी सेवार्थ प्रणालीतून प्राप्त करणे शक्य होते. सविस्तर माहितीपत्रक या परिपत्रकासोबत जोडण्यात येत आहे., त्याचे अवलोकन करून संबंधित सर्वांनी कार्यवाही करावी.

या परिपत्रकासोबत जोडण्यात आलेल्या माहितीपत्रकाची प्रत आपल्या अधिपत्याखालील अधिकारी व कर्मचारी यांचे निर्देशनास आणून त्यांची पोच घेण्यात यावी व ती पोंच लेखा विभागात जमा करावी.

(प्रा.श्री.वि.जोशी )
प्र.प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,
अवसरी (खुर्द), ता. आंबेगाव, जि. पुणे

प्रत:- विभागप्रमुख- यंत्र/स्वयंचल/अणुविद्युत/उपकरणीकरण/संगणक/स्थापत्य/उपयोजित विज्ञान/कर्मशाळा/ग्रंथालय/कार्यालय यांना परिभ्रमणार्थ

परिभ्रमणार्थ

Head Computer Engg. Dept.
Govt. College of Engg. & Research
AVASARI (Kh.) 412405